PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Haapus
Year: 2010

Song: Bolin Je Te Kalel Tyala
Lyricist: Sandeep Khare

बोलीन जे ते कळेल त्याला
जे ना बोलीन कळेल तेही
बोलीन जे ते कळेल त्याला
जे ना बोलीन कळेल तेही
मी ना दिसता चेहरा ज्याचा
कसा घाबरा व्याकूळ होई
कसा असावा असा असावा
ता ना ना ना...
ता ना ना ना...
तोंडा सोबत मनगटातही जोर
जगाला दाविल इंगा
माझ्याहून ही थोडा ज्यादा
माझ्याहून ही मांडेल दंगा
मांडील दंगा मांडील दंगा
जगाला दाविल इंगा
माझ्याहून ही मांडील दंगा
असा असावा
ता ना ना ता ना ना

दिवान दिसतो आता परंतु
मागे आहे अजून सावली
ते तर गेले मजला घेऊन
संसारास्तव काया उरली
असले कोणी लाभायाला
शतजन्मांचे पुण्य लागते
ते नसताही त्यांना आता
मी तुमच्या साऱ्यातून बघते
ता ना ना ता ना ना

ता ना ना ता ना ना
ता ना ना ता ना ना
ता ना ना ना ना ना
ता ना ना ना ना ना
हट्ट मनाचे पुरवून घेईल
आणि मागण्या भलत्या वेडया
अंहं...
लोभस अवखळ येता जाता
दिवस रात्र तो काढील खोडया
खोडयांनी त्या हिरमुसता मी
जवळ ओढूनी कुशीत घेई
आणिक म्हणेल कुसकरल्याविण
गंध फुलांचा खुलतच नाही
ता ना ना ना ना ना
ता ना ना
स्वप्नांच्या गाडीतून मजला
फिरावयाला घेऊन जाई
खटार...टर्र...
मागे बसवून दाविल सारे
धरणी सागर गिरी वनराई
तो असता मग या जन्माचा
उधाणलेला दर्या व्हावा
सगळया गावामध्ये आपुल्या
त्याच्यासम कोणीच नसावा
स्वर्गाची मज गरजच नाही
खांदयावर त्याच्याच विसावा
भरल्या लागून कोसळता जैसा
अंगावरती पाऊस यावा

Literacy for a Billion

शाळेतील लेलेबाईंचा चेहरा
त्याला बघून पडावा
ता ना ना ता ना ना
ता ना ना ता ना ना
ता ना ना ता ना ना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*